23 JAN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तांदळातील सूक्ष्म प्लास्टिक कणांमुळे कर्करोगाचा धोका

## डॉ. अनिल गोरे यांचे संशोधन : महिलांमध्ये सेवनाचे अधिक प्रमाण



प्रा. कोळेकर

कोल्हापूर, ता. २२ : बाजारामध्ये उपलब्ध असलेल्या तांदळाच्या विविध ब्रॅण्ड्समध्ये सूक्ष्म प्लास्टिक कणांचे प्रमाण आढळते, ज्यामुळे कर्करोग, श्वसन आणि पचनाशी संबंधित विकार उद्‌भवण्याचा धोका आहे. विशेषतः महिलांचे सूक्ष्म प्लास्टिक सेवन पुरुष, मुलांपेक्षा जास्त आहे. शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी डॉ. अनिल गोरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या संशोधनातून ते स्पष्ट झाले आहे.

भारतामध्ये तांदळाच्या विविध नमुन्यांमध्ये सूक्ष्म प्लास्टिक कणांचा शोध लावणारे महत्त्वपूर्ण संशोधन डॉ. गोरे आणि त्यांचे सहकारी प्रा. गोविंद कोळेकर (शिवाजी विद्यापीठ) यांनी केले आहे. त्यांनी केलेले संशोधन 'जर्नल ऑफ ह्याझार्डस मटेरिअल्स' या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहे. या अभ्यासाद्वारे तांदळातील सूक्ष्म प्लास्टिक प्रदूषणाच्या ओळखीचा आणि मानवी आरोग्यावर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासात १०० ग्रॅम तांदळामध्ये सरासरी ३०.८ ते८.६१ कण सूक्ष्म प्लास्टिक आढळले. हे कण मुख्यतः पारदर्शक फायबर स्वरूपाचे असून, १००-२०० मायक्रोमीटर इतक्या आकाराचे होते. पॉलिएथिलीन आणि पॉलिएथिलीन टेरेफ्थेलेट या प्रकारचे सूक्ष्म प्लास्टिक कण तांदळामध्ये आढळतात, असे वास्तव समोर आले आहे. दरम्यान, डॉ. गोरे हे मूळचे सदाशिवनगरचे (ता. माळशिरस) आहेत. सध्या ते उका तरसादिया विद्यापीठ, तरसादिया इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल सायन्सेस, सुरत येथे सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांना या संशोधनासाठी प्रा. यासुहितो शिमाडा (मिई युनिव्हर्सिटी, जपान), संशोधक विद्यार्थिनी पिनल भावसार (तरसादिया इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल सायन्सेस), प्रा. शशिकांत पटोले (खलीफा विद्यापीठ, यूएई), डॉ. सुमित कांबळे, मंदीप सोलंकी यांचे सहकार्य लाभले.

### रोजच्या वापरातील तांदूळ मिठाच्या पाण्याने धुवा

■ 'शेतकरी, व्यापाऱ्यांनी तांदळाच्या लागवड, साठवणुकीसाठी शाश्वत आणि पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करावा. रोजच्या वापरामध्ये तांदूळ व्यवस्थित पाण्याने किंवा मिठाच्या पाण्याने स्वच्छ धुण्याने त्यातील सूक्ष्म प्लास्टिक कणांचे प्रमाण कमी होऊ शकते', असे डॉ. गोरे यांनी सांगितले.



- डॉ. अनिल गोरे

"'सूक्ष्म प्लास्टिक प्रदूषणाच्या ओळखीत भारताला महत्त्वपूर्ण यश मिळवून देणाऱ्या या संशोधनामुळे तांदूळ उत्पादन व आरोग्यासाठी सुरक्षिततेचे नवीन मार्ग उघडले गेले आहेत. शाश्वत जीवनशैली अंगीकारल्यास हा धोका कमी करता येऊ शकतो.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ. कोल्हापूर
23 JAN 2025
लोकमत

# तांदळातील सूक्ष्म प्लास्टिक कणांमुळे कर्करोग होण्याचा धोका

## अनिल गोरे यांचे संशोधन : विद्यापीठातील प्रा. जी. बी. कोळेकर यांचाही सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बाजारामध्ये उपलब्ध असलेल्या तांदळाच्या विविध ब्रॅण्ड्समध्ये सूक्ष्म प्लास्टिक कणांचे प्रमाण आढळते. मात्र, हे कण आरोग्यासाठी किती घातक आहेत याचा उलगडा शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी डॉ. अनिल गोरे यांनी संशोधनातून केला. भारतामध्ये तांदळाच्या विविध नमुन्यांमध्ये सूक्ष्म प्लास्टिक कणांचा शोध लावणारे महत्त्वपूर्ण संशोधन प्रा. डॉ. गोरे, प्रा. गोविंद कोळेकर (शिवाजी विद्यापीठ), पिनल भावसार यांनी केले.

डॉ. गोरे यांनी भारतातील विविध तांदळांच्या नमुन्यांचे सूक्ष्म प्लास्टिक प्रदूषणासाठी विश्लेषण केले. यात १०० ग्रॅम तांदळामध्ये सरासरी ३०.८, ८.६१ कण सूक्ष्म प्लास्टिक आढळले. हे कण मुख्यतः पारदर्शक फायबर स्वरूपाचे असून, १००-२०० मायक्रोमीटर आकाराचे होते. पॉलीएथिलीन आणि पॉलीएथिलीन टेरेफ्थेलेट या प्रकारचे सूक्ष्म प्लास्टिक कण तांदळामध्ये आढळतात. हे संशोधन जर्नल ऑफ हॅझार्डस मटेरिअल्स या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाले. अभ्यासातून तांदळातील सूक्ष्म प्लास्टिक प्रदूषणाच्या ओळखीचा आणि मानवी आरोग्यावर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा सखोल अभ्यास केला. सूक्ष्म प्लास्टिक हे अत्यंत घातक दूषित घटक आहेत. यामुळे कर्करोग, श्वसन विकार आणि पचनाशी संबंधित विकार उद्‌भवण्याचा धोका आहे. डॉ. गोरे हे सदाशिवनगर (ता. माळशिरस) येथील रहिवासी असून, सूरतच्या तरसादिया इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल सायन्सेस येथे सहयोगी प्राध्यापक आहेत.

### डॉ. गोरे यांनी सूक्ष्म प्लास्टिक कमी करण्यासाठी सुचवले उपाय

१. त्यांनी शेतकऱ्यांना आणि व्यापाऱ्यांना तांदळाच्या लागवडीसाठी आणि साठवणुकीसाठी शाश्वत व पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करण्याचा सल्ला दिला.

२. रोजच्या वापरामध्ये तांदूळ पाण्याने किंवा मिठाच्या पाण्याने स्वच्छ धुण्याने त्यातील सूक्ष्म प्लास्टिक कणांचे प्रमाण कमी होते.

> “ या संशोधनामुळे तांदूळ उत्पादन व आरोग्यासाठी सुरक्षिततेचे नवीन मार्ग उघडले गेले आहेत. पर्यावरणपूरक उपाययोजना आणि शाश्वत जीवनशैली अंगीकारल्यास हा धोका कमी करता येऊ शकतो.
>
> **- डॉ. अनिल गोरे, संशोधक**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JAN 2025
लोकमत

# विद्यार्थ्यांनी घेतले आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांसह नागरिकांनी बुधवारी आपत्ती व्यवस्थापनाचे धडे घेतले. निमित्त होते व्हाईट आर्मी व शिवाजी विद्यापीठ शिवसहायता, आपत्ती व्यवस्थापन केंद्र राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आयोजित आपत्ती चिंतन व भविष्याचा वेध या आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे.

राजर्षी शाहू सिनेट सभागृहात उज्ज्वल नागेशकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी अजय कोराणे, डॉ. अमोल कोडोलीकर, अशोक रोकडे, पदाधिकारी उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांना व्हाईट आर्मीच्यावतीने देण्यात येणाऱ्या आपत्ती व्यवस्थापन महायोद्धा पुरस्काराने आज, गुरुवारी सन्मानित करण्यात येणार आहे. खासदार शाहू छत्रपती यांच्या हस्ते सायंकाळी ४ वाजता विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात या पुरस्काराचे वितरण होईल.

23 JAN 2025 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘सुवर्णगंध’तील व्यक्तिचित्रे अंतर्मुख करणारी

## डॉ. शिंदे : प्राचार्य जी. पी. माळी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

■ सकाळ वृत्तसेवा



**कोल्हापूर : डॉ. जी. पी. माळी लिखित ‘सुवर्णगंध’ पुस्तकाचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. बी. एम. हिर्डेकर, ॲड. अजित सूर्यवंशी, राजाभाऊ पाटील, सतीश भारतीय आदी.**

कोल्हापूर, ता. २२ : ‘ज्यांच्या पायावर डोके ठेवावे, अशी व्यक्तिमत्त्वे समाजात कमी आहेत. अशा काळात समाजातील चांगुलपणा शोधत, व्यक्तिचित्रे रेखाटणे ही बाब उमेद वाढविणारी आहे. प्राचार्य डॉ. जी. पी. माळी यांच्या ‘सुवर्णगंध’ पुस्तकातील अशी व्यक्तिचित्रे साऱ्यांनाच अंतर्मुख करतात,’ असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केले. अक्षर दालन येथे झालेल्या पुस्तकाच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक बी. एम. हिर्डेकर म्हणाले, ‘वाचन-लिखाणातून माणूस शहाणा होण्याची प्रक्रिया असते. व्यक्तिचित्रे, चरित्रे, आत्मचरित्राच्या माध्यमातून समाजाला वेगळी दृष्टी लाभते. साहित्यकृतीतून विविध व्यक्तिमत्त्वे उलगडत असतात.’

राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपसचिव सतीश भारतीय यांनी समाजाला सद्विचारांनी गंधित करणारी ही साहित्यकृती असल्याचे सांगितले. लेखक डॉ. माळी यांनी मनोगतादरम्यान लेखन प्रवास, विविध टप्प्यांवरील अनुभव सांगितले.

सांगलीचे ॲड. अजित सूर्यवंशी, दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजाभाऊ पाटील उपस्थित होते. प्राचार्य प्रवीण चौगुले यांनी प्रास्ताविक केले. निशांत गोंधळी यांनी सूत्रसंचालन केले. प्रकाशक अमेय जोशी यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JAN 2025
तरुण भारत

# व्यक्तीचित्रांचा उलगडणारा प्रवास 'सुवर्णगंध'मध्ये

■ कुलसचिव व्ही. एन. शिंदे

**कोल्हापूर :** 'ज्यांच्या पायावर डोकं ठेवावं अशी व्यक्तिमत्वे समाजात कमी आहेत. अशा काळात समाजातील चांगुलपणा शोधत, व्यक्तिचित्रे रेखाटणे ही बाब उमेद वाढविणारी आहे. प्राचार्य डॉ. जी. पी. माळी यांच्या 'सुवर्णगंध' पुस्तकातून वेगवेगळया क्षेत्रातील व्यक्तिचित्रांचा उलगडणारा प्रवास हा समाजमनाचेही जीवन सुगंधित करतो, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांनी काढले.

प्राचार्य डॉ. जी. पी. माळी यांच्या 'सुवर्णगंध' पुस्तकाचा प्रकाशन समारंभ नुकताच झाला. कुलसचिव शिंदे यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे माजी नियंत्रक बी. एम. हिर्डेकर हे प्रमुख वक्ते होते. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपसचिव सतीश भारतीय, सांगलीचे ॲड. अजित सुर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JAN 2025
Times of India

# Historian pens book exploring Maratha queen Tarabai's life


TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Penning a novel based on the life of Maharani Tarabai, founder of the Karvir Kingdom and daughter-in-law of Chhatrapati Shivaji Maharaj, who fought against the Mughals for years, was my life mission, said eminent historian and Maratha history researcher Jaysingrao Pawar.

Pawar, an octogenarian historian, has written extensively on Maratha history, especially on unsung heroes. After laborious work of nearly a decade, Pawar completed an 800-page book on Maharani Tarabai— 'Moghalmardini Maharani Tarabai', in two parts. The book will be presented on Friday by NCP (SP) MP Supriya Sule at New Palace.

Addressing a press conference with Congress MP Shahu Chhatrapati Maharaj and former Rajya Sabha MP Sambhajiraje Chhatrapati by his side, Pawar said, "Not many know about Tarabai Maharani. Her husband, the younger son of Shivaji Maharaj, Rajaram Maharaj, fought against the Mughals for 11 years. The baton was passed on to Tarabai after the demise of her husband, and she fought in such a way that the Mughals had to give up and return to the north. The first thought to write a book on such a valorous Maratha woman came to my mind in 1962 and it has taken me nearly six decades to complete my life mission."

TOI



Historian Jaysingrao Pawar

Pawar said he wished to get the statue of Tarabai Maharani established at Panhala Fort outside her palace. Panhala was the capital of the Karvir Kingdom and from the fort, she ran the state. "The first part of the book is about her fight against the Mughals, and the second is about her struggle with the Peshwas, who were undermining Satara's seat," he said.

23 JAN 2025 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ परीक्षांचे निकाल १५ दिवसांत

## परीक्षा काळातच ७८५ पैकी ३६० अभ्यासक्रमांचे निकाल

**कोल्हापूर : वैभव गोंधळी**

शिवाजी विद्यापीठाने कमी वेळेत उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करून अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात यश मिळवले आहे. सध्या सुरू असलेल्या ऑक्टोबर-नोव्हेंबर सत्रातील परीक्षांचे निकाल विद्यापीठाने सरासरी १५.९३ दिवसांत जाहीर केले. नियोजित परीक्षांच्या एकूण ४५.८६ टक्के अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.



शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा दि. २५ नोव्हेंबर २०२४ पासून सुरू आहेत. यावेळी एकूण ७८५ परीक्षा नियोजित आहेत. त्यापैकी ३६० परीक्षांचा निकाल मंगळवार, दि. २१ जानेवारीपर्यंत जाहीर करण्यात आला आहे. या सेमिस्टरमध्ये विद्यापीठाने सरासरी १५.९३ दिवसांत निकाल लावण्यामध्ये यश मिळवले आहे. गेल्या काही परीक्षांमध्ये विद्यापीठाकडून परीक्षांचे निकाल वेळेत लागावेत यासाठी खबरदारी घेतली जात आहे. त्यामुळे परीक्षेपूर्वी कमी वेळेत मूल्यमापन करण्यासाठी वेळपत्रक तयार करण्यात आले. त्याच्या अंमलबजावणीबाबत प्राचार्य, उत्तरपत्रिका मूल्यमापन केंद्राचे (कॅप) संचालक, शिक्षक, कर्मचारी आदींना मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे अचूकपणे विक्रमी वेळेत निकाल जाहीर करणे परीक्षा विभागाला शक्य झाले आहे.

### दृष्टिक्षेपात निकाल

| | |
|---|---|
| १ ते १० दिवसांतील निकाल | ८२ |
| ११ ते २० दिवसांतील निकाल | १९२ |
| २१ ते ३० दिवसांतील निकाल | ८६ |
| एकूण | ३६० |

### विद्याशाखानिहाय निकाल

| | |
|---|---|
| विज्ञान व तंत्रज्ञान | १३६ |
| वाणिज्य व व्यवस्थापन | ५३ |
| मानव्यविद्या | ५३ |
| आंतरविद्याशाखीय | ११८ |
| एकूण | ३६० |

परीक्षा झाल्यानंतर ३० ते ४५ दिवसांत निकाल जाहीर करण्याबाबत कुलपती कार्यालयाकडून निर्देश आहेत; पण शिवाजी विद्यापीठाने या मुदतीपेक्षा कमी दिवसांत निकाल जाहीर करण्यामध्ये यश मिळवले आहे. सरासरी १५.९३ दिवसांत निकाल जाहीर केले आहेत.

**– डॉ. अजितसिंह जाधव**
**संचालक, परीक्षा व मूल्यमान मंडळ**

### परीक्षा विभाग अशी राबवतो प्रक्रिया

निकाल अचूक व वेळेत लावण्यासाठी परीक्षेच्या आधीपासून तयारी करण्यात आली. परीक्षा विभागातर्फे उत्तरपत्रिका मूल्यमापन तक्ता 'कॅप' सेंटरना पाठविण्यात आला. होणाऱ्या मूल्यमापनाच्या कामकाजाचा जिल्हानिहाय दैनंदिन आढावा घेण्यात येतो. त्यानुसार मूल्यमापनाच्या कामाची दिशा ठरवली जाते. मूल्यमापन मंडळाचे संचालक व त्यांचे सहकारी यांच्या प्रयत्नांमुळे अचूक आणि कमी कालावधीमध्ये निकाल जाहीर करणे शक्य होते.

23 JAN
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालय व संस्थांमधील अखिल भारतीय उच्चशिक्षण सर्वेक्षण कार्यक्रमाच्या नोडल अधिकारी यांच्याकरिता एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली. विद्यापीठाचा सांख्यिकी कक्ष आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू सभागृहात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते. राज्याचे एआयएसएचई नोडल अधिकारी स्वप्नील कोरडे यांनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. एस. डी. डेळेकर, अभिजित रेडेकर यांनी माहिती दिली. यावेळी कोल्हापूर, सांगली व सातारा या परिक्षेत्रातील दोनशेहून अधिक नोडल अधिकारी उपस्थित होते.